# प्रकरण तिसरे

<u>प्रकरण तिसरे</u>

# 'दि विटा अर्बन को-ऑप. लि., विटा'ची ऐतिहासिक पार्श्वभूमी

३.१ भारतातील नागरी सहकारी बँकांची सद्यःपरिस्थिती

३.२ भारतातील नागरी सहकारी बँकांचा प्रादेशिक विषमतोल

३.३ महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांची वाटचाल

३.४ सांगली जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी

३.४.१ जिल्ह्याचे स्थान

३.४.२ सांगली जिल्ह्यातील नागरी सहकारी बँका

३.४.३ दि विटा अर्बन को-ऑप. बँक लि., विटाची स्थापना

३.५ सारांश

प्रकरण तिसरे

# 'दि विटा अर्बन को. ऑप बँक लि., विटा'ची ऐतिहासिक पार्श्वभूमी

## प्रास्ताविक :

भारताला १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले त्यानंतर महाराष्ट्र राज्याचा सर्वांगीण, आर्थिक विकास साध्य करण्यासाठी सहकारी चळवळीचे मोठे योगदान आहे. महाराष्ट्र राज्यातील लोकांचे जास्तीत जास्त हित साधण्याचा उद्देश आज नवीन आर्थिक धोरणाच्या काळात जोपासण्याचा प्रयत्न केला जातो. महाराष्ट्रातील बहुसंख्य आर्थिक दृष्ट्या कमकुवत असणाऱ्या लोकांच्या आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे त्या अनुरोधाने अनेक कार्यक्रम आखले गेले. परंतु परंपरागत विचारसरणीच्या लोकांच्यामुळे यशस्वी झाले नाहीत. त्याच काळात महाराष्ट्रात सहकारी चळवळ झपाट्याने वाढत होती. या संस्था सर्वसामान्य आर्थिक गटातील लोकांनी आपल्या स्वःताच्या गरजा व उन्नती व समस्या सामुहिक व सरकारी प्रयत्नांनी सोडविता याव्यात म्हणून सहकारी तत्त्वावर संस्था निर्माण केल्या. बऱ्याच संस्थावर आजही लोकांचा विश्वास आहे. त्याचा विकासात सहकाराच्या माध्यमातून यश प्राप्त होते. त्यातून महाराष्ट्रातील सहकारी चळवळ योग्य दिशेने वाढत राहिली. दि विटा अर्बन को. ऑप बँकेचा अभ्यास करत असताना भारतातील नागरी सहकारी बँकांचा प्रगतीबरोबरच महाराष्ट्रात झालेल्या नागरी बँकांच्या प्रगतीचा आढावा घेऊन सांगली जिल्ह्यातील नागरी बँकांची प्रगती कशी आहे याची सांख्यकिय माहिती घेतलेली आहे.

## ३.१ भारतातील नागरी सहकारी बँकांची सद्यःपरिस्थिती :

१९०४ च्या सहकारी कायद्यानंतर लगेचच स्थापन झालेल्या नागरी सहकारी बँकिंग चळवळीला २००४ मध्ये १०० वर्ष पूर्ण झालीत. भारतीय नागरी सहकारी पतसंस्थेच्या विकासाला सुरुवात झाली ती खऱ्या अर्थाने १९१५ नंतरच कारण स्थानिक व्यापारी बँकांचे पतपुरवठ्याच्या



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

कार्यातील अपयश, मध्यमवर्गीय व लहान उद्योजक यांच्याकडे झालेले दुर्लक्ष व या पार्श्वभूमीतून १९१५ मध्ये मॅकलॅगन समितीने नागरी सहकारी पतसंस्थाचे प्रतिपादन केलेले महत्त्व यामुळे नागरी भागातील मध्यमवर्गीय सुशिक्षित मंडळींचे लक्ष या संस्थाकडे अधिकाअधिक वेधण्यास सुरुवात झाली. १९१९ ते १९३८ या काळात मुंबई व मद्रास प्रांतात अनेक नागरी सहकारी पतसंस्था स्थापन झाल्या.

१९६५ पासून भारतीय रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण सुरु झाल्यामुळे बँकिंग कार्यप्रणालीत व्यवस्थितपणा, शास्त्रशुद्धता व नियोजन आले ग्राहकांचा बँकांवरील विश्वास वाढत गेला. बँकांच्या व्यवसायात विविधता आली यामुळे १९६० ते २००४ या कालावधीत नागरी सहकारी बँकांची संख्यात्मक व गुणात्मक या दोन्ही दिशांनी वेगाने प्रगती झाली. भारतीय रिझर्व्ह बँकेने १९९१ मध्ये सतीश मराठे यांच्या अध्यक्षतेखाली नागरी सहकारी बँकांची स्थापना, कार्यक्षेत्र, कार्यपद्धती, संघटन याबाबतीत महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या. या शिफारशींची अमंलबजावणी मे १९९३ पासून करण्यात आली. मे १९९९ मध्ये के. माधवराव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती नेमली. या समितीने नागरी सहकारी बँकावरील दुहेरी नियंत्रण, बँका आजारी होण्याचे वाढते प्रमाण, बँकाचा व्यावसायिक दृष्टिकोन या समस्यांवर दृष्टिक्षेप टाकला आहे.

खालील तक्ता क्र. ३.१ वरून सन १९९६ ते २००६ या कालावधीतील भारतातील नागरी सहकारी बँकांच्या प्रगतीची थोडक्यात माहिती घेतली आहे.

## भारतातील नागरी सहकारी बँकांची प्रगती

**तक्ता क्रमांक ३.१**

(रू. कोटीत)

| अ. क्र. | वर्ष | नागरी बँकांची संख्या | ठेवी | ठेवीतील वार्षिक वाढीची % | कर्ज | कर्जातील वार्षिक वाढीची % |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | १९९६ | १५०१ | २४६१ | - | १७९२७ | - |
| २. | १९९८ | १५०२ | ४०६९२ | ६८.४ | २७८०७ | ५५% |
| ३. | २००१ | १६१८ | ८०८४० | ९८.७ | ५४३८९ | ९५.६% |
| ४. | २००२ | १८५४ | ९३०६९ | १५.१ | ६२०६० | १४% |
| ५. | २००३ | १९४१ | १,०१,५४६ | ९.१ | ६४८८० | ४.५% |
| ६. | २००४ | १९२६ | १,१०,२५६ | ८.६ | ६७९३० | ४.७% |
| ७. | २००५ | १८७२ | १,०५,०२१ | -४.७ | ६६८७४ | -१.६% |
| ८. | २००६ | १८५३ | १,१२,२३७ | ६.९ | ७०३७९ | ५.२% |

संदर्भ : www.bis.org/publ/bc bs/22.htm

वरील तक्ता क्रमांक ३.१ वरून भारतातील नागरी बँकांच्या ठेवीमध्ये कशा पद्धतीने वाढ झाली आहे हे स्पष्ट होते. त्याचबरोबर बँकेने दिलेले कर्जाचे प्रमाण दर्शविले आहे. याबाबत भारतात नागरी बँकांचा विकास झपाट्याने होत असल्याचे दिसून येते.

### ३.२ भारतातील नागरी सहकारी बँकाचा प्रादेशिक विषमतोल :

भारतातील नागरी सहकारी बँकांचा अभ्यास करत असताना त्याच्यात असणारा प्रादेषिक विषमतोल हा सुद्धा महत्त्वाचा मुद्दा असलेला दिसून येतो. कृषीप्रधान भारतीय अर्थव्यवस्थेत नागरी सहकारी बँकांची भूमिका महत्त्वाची असलेली दिसून येते. नागरी भागातील समस्यांचा अभ्यास करून बँका त्या समस्या सहकाराच्या माध्यमातून सोडविण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणात करत असलेल्या दिसून येतात. रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकांचा शाखा विस्तार करण्यास दिलेली परवानगी व नागरी बँकाचे वाढत जाणारे महत्त्व यादृष्टीने

त्याची प्रगती झपाट्याने होत चाललेली आहे. भारतातील सहकारी चळवळीत नागरी सहकारी बँका महत्त्वाची कामगिरी पार पाडत आहेत.

सन १९९१ च्या नवीन आर्थिक सुधारणा व नरसिंहम समितीच्या शिफारशी यामुळे नागरी बँकाची प्रगती मोठ्या प्रमाणात झालेली दिसून येते. नागरी बँकांनी व्यापारी बँकाप्रमाणे आपल्या सभासदांना व ग्राहकांना वेगवेगळ्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. नागरी बँकांनी केलेल्या प्रगतीच्या आकडेवारीवरून असे दिसून येते की त्यांनी केलेली प्रगती सर्व राज्यात समान नसून त्यात मोठ्या प्रमाणात विषमता दिसून येते काही राज्यातील प्रगती नेत्रदिपक आहे तर काही राज्यात म्हणावी तेवढी झालेली नाही. ज्या राज्यात नागरी सहकारी बँकांची प्रगती झालेली नाही त्या राज्यात नागरी बँकांच्या विकासास नागरी बँका महत्त्वाची भूमिका बजावत असल्याने त्याचा समतोलीत विकास होणे आवश्यक आहे खालील तक्ता क्र. ३.२ वरून भारतातील नागरी बँकाची राज्यवार असणारी स्थिती स्पष्ट होते.

## भारतातील नागरी सहकारी बँकांची राज्यवार स्थिती
## तक्ता क्रमांक ३.२

| अ. क्र. | राज्य | बँकांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | मार्च २००४ | मार्च २००६ |
| १. | महाराष्ट्र/गोवा | ८३४ (३२.९१) | ८३० (३३.९९) |
| २. | गुजरात | ३२८ (१७.०३) | २९६ (१५.९७) |
| ३. | कर्नाटक | ३०० (१५.५७) | २९७ (१६.०२) |
| ४. | केरळ | ६३ (३.२७) | ६० (३.२३) |
| ५. | आंध्रप्रदेश | १३३ (६.९०) | १२४ (६.६९) |
| ६. | तामिळनाडू/पॉंडिचरी | १३४ (६.९५) | १३२ (७.१२) |
| ७. | उत्तरप्रदेश/उत्तरांचल | ८० (४.१५) | ७७ (४.१५) |
| ८. | राजस्थान | ४२ (२.१८) | ३९ (२.१०) |
| ९. | मध्यप्रदेश/छत्तीसगड | ८१ (४.२०) | ७५ (४.०४) |
| १०. | पश्चिम बंगाल | ५२ (२.६९) | ५१ (२.७५) |
| ११. | नवी दिल्ली | १६ (०.८३) | १५ (०.८०) |
| १२. | उडिसा | १३ (०.६७) | १४.(०.७५) |
| १३. | पंजाब/हरियाणा/ हिमाचल प्रदेश | १७ (०.८८) | १६ (०.८६) |
| १४. | जम्मू व काश्मिर | ४ (०.२०) | ४ (०.२१) |
| १५. | आसाम व उत्तर पूर्व राज्य | २४ (१.२४) | १८ (०.९७) |
| १६. | बिहार/झारखंड | ५ (०.२५) | ५ (०.२६) |
| | एकूण- | १९२६ (१००) | १८५३ (१००) |

संदर्भ :- www.bis.org/publ/bcbs/22.htm
- RBI Bulletins - Nov. 2006

वरील तक्ता क्र. ३.१ मध्ये भारतातील नागरी सहकारी बँकाची राज्यवार स्थिती दर्शवली आहे एकूण बँकेच्या ६६% नागरी सहकारी बँका महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक या राज्यात असलेल्या दिसून येतात तर ३४% नागरी सहकारी बँका इतर राज्यात असलेल्या दिसून येतात. यातही जवळजवळ ३४% नागरी सहकारी बँका एकट्या महाराष्ट्रात आहेत म्हणजेच महाराष्ट्रात नागरी सहकारी बँकांची संख्या सर्वात जास्त आहे तर त्या खालोखाल गुजरात, कर्नाटक या राज्याचा क्रमांक लागतो सर्वात कमी नागरी सहकारी

बँकांचे प्रमाण जम्मू व काश्मिर, बिहार, झारखंड या राज्यात असून ते (०.४७%) च्या दरम्यान आहे. यावरून असे स्पष्ट होते की भारतात नागरी सहकारी बँकांची प्रगती ही प्रत्येक राज्यात कमी -जास्त झालेली दिसून येते.

### ३.३ महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांची वाटचाल :-

नागरी सहकारी चळवळीचा इतिहास तसा शंभर वर्षाचा आहे. कै. विठ्ठल लक्ष्मण कवठेकर यांनी स्थापन केलेली ' अन्योन्य सहकारी संस्था' ही नागरी चळवळीची गंगोत्रीच मानली जाते. मॅक्लॅगन समितीपासून ते मराठे समितीपर्यंत नागरी सहकारी बँकांची एकमुखाने स्तुतीच केली आहे. छोटे, कारागीर छोटे उद्योजक, पगारदार नोकरवर्ग यांच्यासारख्या समाजातील छोट्या घटकांसाठी नागरी बँका पतपुरवठ्याचे उत्तम कार्य करतात असे त्यांनी नमुद केलेले आहे महाराष्ट्रात सहकारी कायदा १९६० साली संमत करण्यात आला महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे सिंहावलोकन केल्यास नागरी सहकारी बँकांची चळवळ ही एकूण सहकारी चळवळीचा मानबिंदू समजला जातो गेल्या दशकातील नागरी सहकारी बँकांच्या चळवळीचे अवलोकन केल्यास ही चळवळ समाजातील सर्व स्तरातील घटकापर्यंत पोहोचल्याचे दृश्य दिसेल नागरी पतपुरवठ्याच्या क्षेत्रामध्ये नागरी सहकारी बँकांनी उल्लेखनीय प्रगती केली आहे. राष्ट्रीय ध्येयधोरणाच्या चौकटीमध्ये योजनाबद्ध आर्थिक विकास घडवून आणण्याच्या कार्यात नागरी सहकारी बँकाचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

नागरी सहकारी बँकांचा महाराष्ट्रात झालेला विकास अभिमानास्पद आहे राज्यात सहकारी चळवळीत नागरी सहकारी बँकांनी आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. कोणत्याही राज्याचा आर्थिक संपत्तीचा विचार करताना त्या राज्यातील शेती उत्पादन, उद्योगधंदे, व्यापार, स्वयंरोजगार यासाठी नागरी सहकारी बँकांच्या माध्यमातूनही पतपुरवठा करण्यात येतो. १९६५ नंतर रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकांना आपल्या शाखा काढण्याची परवानगी दिल्यामुळे या बँकांचा विकास झाला महाराष्ट्रात नागरी बँकांची प्रगती ही मुंबई, नाशिक, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, सांगली, सातारा

या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात झाली असून जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांची संख्या ही महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकेच्या संस्थेत ५0% पेक्षा अधिक आहे. महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांची प्रगती पुढील तक्ता क्र. ३.३ मध्ये दर्शवली आहे.

**महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांची प्रगती**
**तक्ता क्रमांक ३.३**

(रुपये लाखांत)

| अ.क्र. | तपशील | १९९१ | १९९५ | २000 | २00४ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | बँकांची संख्या | ३८१ | ४५६ | ६४0 | ६३४ | २,१११ |
| २. | सभासद (हजारात) | ४,४६४ | ६,६२९ | ९,२१६ | ८,२७१ | २८,५८0 |
| ३. | भागभांडवल | १८,६८२ | ३३,९२७ (८१.६0) | ५१,३१२ (५१.२४) | १,३९,२५९ (१७१) | २,४३,१८0 |
| ४. | स्वनिधी | ५५,५४0 | १,१४,३३३ | २,२१,३९८ | - | ३,९१,२७१ |
| ५. | खेळते भांडवल | ६,१७,६४२ | ११,७६,७२६ | २,८६,५३0 | ६८,७४,९४२ | १,१५,३५,८४0 |
| ६. | दिलेली कर्जे | ५,५५,२४६ | ९,३८,७७0 | १५,७६,४५८ | ४२,२८,३२४ | ७२,९८,७९८ |
| ७. | थकबाकी | ४५,७३५ | ७६,५४५ | १,१४,५१८ | २,५३,२१६ | ४,९0,0१४ |
| ८. | नफ्यातील संख्या | ३६७ | ३६७ | ५0३ | ५७८ | १८१५ |
| ९. | नफा | ७,११६ | १३,६५६ | - | ६४,४१६ | ८५,१८८ |
| १0. | तोट्यातील बँका | १३ | ६५ | ११७ | ५५ | २५0 |
| ११. | तोटा | १६३ | ३,५२0 | - | २४,४१८ | २८,१0१ |

संदर्भ : महाराष्ट्रातील सहकारी चळवळ : एका दृष्टिक्षेपात - २00४

वरील तक्ता क्र. ३.२ मध्ये महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांच्या सन १९९१ ते २00४ या कालावधीत झालेल्या बदलाचा आढावा घेतला आहे. सन १९९१ मध्ये नागरी सहकारी बँकांची संख्या ३८१ होती त्यात सन १९९५ पर्यंत ७५ बँकांची वाढ झालेली आहे तर सन २00४ पर्यंत २५३ एवढ्या नवीन नागरी सहकारी बँका सुरु झालेल्या आहेत. नागरी सहकारी बँकांच्या सभासदांमध्येसुद्धा वर्षानुवर्षे मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. १९९१

मध्ये ४४६४ हजार इतकी असणारी सभासद संख्या सन २००४ पर्यंत ८२७१ हजार एवढी वाढलेली आहे. बँकेच्या प्रगतीत भागभांडवल हा घटकसुद्धा महत्त्वाचा आहे. सन १९९१ मध्ये बँकांचे भागभांडवल १८६८२ रु. कोटी इतके होते. त्यात सन १९४५ पर्यंत वार्षिक ८.६०% इतकी वाढ झाली आहे तर १९९५ ते २००४ या कालावधीत वार्षिक वाढ दुप्पट झाली आहे. नागरी सहकारी बँकेच्या थकबाकीचा विचार करत असताना सन १९९१ मध्ये ४५,७३५ रु. लाख इतकी होती तर त्यात वाढ होऊन सन १९९५ पर्यंत ७६,५४५ रु. लाख इतकी झाली तर सन २००४ पर्यंत यात वाढ होऊन २,५३,२१६ रु. लाख इतकी वाढलेली दिसून येते. नागरी सहकारी बँकेच्या नफ्यातील व तोट्यातील बँकांचा विचार करता सन १९९१ मध्ये ३६७ बँका नफ्यात होत्या तर तर १३ नागरी बँका तोट्यात होत्या. त्यात सन २००४ पर्यंत वाढ होऊन ५७८ बँका नफ्यातील तर ५५ बँका तोट्यात असलेल्या दिसून येतात. यावरून महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांची प्रगती कशाप्रकारे झाली याची माहिती मिळते.

## ३.४ सांगली जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

स्वातंत्र्यपूर्व काळापासून स्वातंत्र्य प्राप्तीसाठी पूर्वीचा सातारा व त्याचा विभागून झालेला आत्ताच्या सांगली जिल्ह्याने केलेली कामगिरी प्रसिद्ध आहे. पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ही या जिल्ह्याने विकास क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती केली आहे. दक्षिण महाराष्ट्रातील व्यापारी, औद्योगिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात जिल्ह्याचे प्रमुख ठिकाण असलेल्या "सांगली शहर" पूर्वी संस्थान होते. नंतर स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संस्थान विलीनीकरणाच्या वेळी सातारा जिल्ह्याला सांगली, मिरज, बुधगाव, जत, फलटण इत्यादी संस्थाने जोडण्यात आली त्यामुळे सातारा जिल्हा फारच मोठा झाला. राज्यकारभाराच्या वृष्टीने सोईचे जावे म्हणून सातारा जिल्ह्याचे उत्तर सातारा दक्षिण सातारा असे दोन स्वातंत्र्य जिल्हे १ ऑगष्ट १९४९ रोजी करण्यात आले. पुढे २१ नोव्हेंबर १९६० रोजी दक्षिण सातारा जिल्हा हा सांगली जिल्हा म्हणून अस्तित्वात आला.



16367

सांगली जिल्ह्याची व्याप्ती ८६०१.५ चौ. कि. मी. असून भौगोलिक-दृष्ट्या राज्यात २१ वा क्रमांक लागतो. जिल्ह्यामध्ये ७११ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. जिल्ह्यात नगरपरिषदा ४ आहेत तर ८ पंचायत समित्या असून सध्या जिल्ह्यात १० तालुके आहेत.

सन २००१ च्या जनगणनेनुसार सांगली जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २५,८३,५२४ कोटी आहे. जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान ६२५ मी. मी. असून पूर्वेकडे ते कमी कमी होत जाते. एकूण लोकसंख्येच्या ७९% लोक ग्रामीण भागात राहतात व त्यांची उपजीवीका शेतीवर चालते. राज्याच्या तुलनेत हे प्रमाण १४% नी जास्त आहे.

## ३.४.१ जिल्ह्याचे स्थान :

सांगली जिल्हा १६°-४५° ते १७°-४३° उत्तर अक्षांश व ७३°-४२° ते ७५°-४०° पूर्व रेखांश यामध्ये विस्तारला असून जिल्ह्याचा आकार पूर्व पश्चिम लांबट चिचोळा आहे. जिल्ह्याचा विस्तार सह्याद्रीच्या पूर्व उतारापासून पूर्व पश्चिम अंदाज २०५ कि. मी. लांब व मध्यभागी दक्षिणोत्तर अंदाजे ९६ कि. मी रुंद आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस सोलापूर व सातारा दक्षिणेस कोल्हापूर, पश्चिमेस रत्नागिरी व पूर्वेस कर्नाटक राज्यातील विजापूर जिल्हा आहे.

## ३.४.२ सांगली जिल्ह्यातील नागरी सहकारी बँका :

स्वातंत्र्योत्तर काळात राजकारण, समाजकारण, शिक्षणक्षेत्र, सहकारी चळवळ, शेती विकास अशा अनेक क्षेत्रात सांगली जिल्ह्याने आघाडीवर राहून काम केले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील एक प्रगत जिल्हा असा या जिल्ह्याचा नावलौकिक आहे. याचे बरेच श्रेय सहकार क्षेत्राला काम करणाऱ्या नेत्यांना द्यावे लागते.

सांगली जिल्हयात दहा तालुके आहेत. कृष्णा वारणा, वेरळा, अग्रणी या चार प्रमुख नद्यानी सांगली जिल्ह्याचा निम्मा भाग सुपीक बनविलेला आहे. नदीपासून लांब असलेल्या कवठेमहांकाळ, जत, आटपाडी, तासगांव, खानापूर व मिरज तालुक्यातील पूर्व भाग असा निम्मा सांगली जिल्हा दुष्काळी असा

आहे. सांगली जिल्ह्यात दहा सहकारी साखर कारखाने आहेत. त्यापैकी वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना लिं., सांगली हा आशिया खंडातील सर्वात मोठा कारखाना आहे. शेतमालाचे उत्पादन, विक्री यामध्ये हळदीची बाजारपेठ हे सांगलीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे.

सांगली जिल्ह्यातील व्यापार, उद्योग, शेती व शेतीपूरक उद्योग यांना अर्थपुरवठा करण्याच्यादृष्टीने बँकांचे जाळे विस्तृतपणे निर्माण झालेले आहे. प्रामुख्याने सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही शेतकरी जीवनाशी निगडित असल्याने त्या बँकेने शेती उपक्रमाला मोठे सहकार्य दिले आहे. राष्ट्रीयकृत बँका, व्यापारी बँका व सहकारी बँका यांचे विस्तृत जाळे सर्व भागात पसरलेले असून त्यांचे कामही तेथील लोकजीवनात पोकळ ठरले आहे.

सांगली जिल्ह्यात सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली या पहिल्या बँकेचे संस्थापक माधवराव गोडबोले यांनी १,१०० रुपये भांडवल गोळा करून ४ नोव्हेंबर १९३५ साली स्थापन केली. सध्या बँकेच्या ३५ शाखा आहेत.

सन २००४-०५ अखेर सांगली जिल्ह्यात ३० नागरी बँका होत्या. ३१ मार्च २००३ या काळात सांगली जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांची प्रगती पुढील तक्ता क्र. ३.४ मध्ये दाखविलेली आहे.

## सांगली जिल्ह्यातील नागरी बँकांची प्रगती

**तक्ता क्रमांक ३.४**

(रुपये कोटीत)

| अ. क्र. | घटक | ३१ मार्च २००३ अखेर |
|---|---|---|
| १. | नागरी बँकांची संख्या | ३० |
| २. | सभासद संख्या | ३,०९,५७१ |
| ३. | भागभांडवल | ५,८३,०८७ |
| ४. | राखीव व इतर निधी | १७,९१,५०६ |
| ५. | ठेवी | २,६०,५८,२७५ |
| ६. | खेळते भांडवल | ३,०४,५३,७४१ |
| ७. | अग्रीम | ९९,८५,३४३ |
| ८. | वसूल झालेले कर्ज | ८८,७२,५५७ |
| ९. | येणे कर्ज | १,९९,३५,०६५ |
| १०. | थकित कर्ज | १७,७८,३६० |

**संदर्भ :** जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन सांगली जिल्हा २००२-०३

वरील तक्ता क्रमांक ३.३ वरून सांगली जिल्ह्यातील नागरी बँकांची प्रगती समजून येते. त्यानंतर तक्ता क्रमांक ३.४ वरून सांगली जिल्ह्यातील सन १९९५ ते २००५ या कालावधीत नागरी बँकेत झालेल्या बदलाची माहिती घेतली आहे.

## सांगली जिल्ह्यातील अर्बन बँकांची संख्या

तक्ता क्रमांक ३.५

| अ. क्र. | वर्ष | बँकांची संख्या |
|---|---|---|
| १. | १९९५-९६ | ३२ |
| २. | १९९६-९७ | ३२ |
| ३. | १९९७-९८ | ३२ |
| ४. | १९९८-९९ | ३२ |
| ५. | १९९९-२००० | ३२ |
| ६. | २०००-२००१ | ३१ |
| ७. | २००१-२००२ | ३१ |
| ८. | २००२-२००३ | ३० |
| ९. | २००३-२००४ | ३० |
| १०. | २००४-२००५ | ३० |

संदर्भ : सांगली जिल्हा अर्बन बँक असोसिएशनचे वार्षिक अहवाल.

वरील तक्ता क्र. ३.४ मध्ये सांगली जिल्ह्यातील सन १९९५ ते २००५ या कालावधीत अर्बन बँकेच्या संख्येत झालेल्या बदलांचा आढावा घेतला आहे. १९९५ ते २००० या कालावधीत नागरी सहकारी बँकांच्या संख्या ३२ एवढ्या स्थिर राहिल्या आहेत, तर २००० ते २००२ या दरम्यान ही संख्या कमी होऊन ३१ एवढी झालेली आहे. तसेच सन २००२ ते २००५ या कालावधीत नागरी सहकारी बँकांची संख्या कमी होऊन ती ३० एवढी स्थिर राहिलेली आहे. यावरून असे स्पष्ट होते की, अर्बन बँकेची संख्या कमी होत आहे.

### ३.४.३ 'दि विटा अर्बन को-ऑप. बँक लि., विटा'ची स्थापना :-

सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुका हा एक विविध भौगोलिक जडणघडणीचा आढळतो. या त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण स्थानामुळे अनेक विकास प्रश्न निर्माण झालेले आहेत. खानापूर तालुका दुष्काळग्रस्त तालुका म्हणून ओळखला जातो. कायमस्वरूपी पडणारा दुष्काळ यामुळे तालुक्यातील

सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थिती म्हणावी तशी चांगली नाही. ग्रामीण व नागरी भागातील बहुसंख्या लोकसंख्या शेती व्यवसायात गुंतलेली आहे. तालुक्यामध्ये सहकारी तत्त्वावरील एक सहकारी साखर कारखाना आहे. त्याचबरोबर तालुक्यातील विटा शहरात मोठ्या प्रमाणात व्यापाराचे केंद्र प्रस्थापित झालेले दिसून येते. त्याचबरोबर विटा शहरात हातमाग उद्योगाचा विकास, व्यापार, बाजारपेठ इत्यादीचा मोठ्या प्रमाणात विकास झालेला आहे. त्याचबरोबर लोकांना कर्जपुरवठा, ठेवीचे संकलन यासाठी बँकेची स्थापना झालेली दिसून येते.

'दि विटा अर्बन को-ऑप. बँक लि., विटा'ची स्थापना कै. आदरणीय लोकनेते हणमंतराव पाटीलसाहेब यांनी १५/३/१९७२ मध्ये केलेली आहे. त्यावेळी मोठा दुष्काळ पडला असताना विटा शहरातील व्यापारी, हातमाग उद्योग, कारागिर, शहरातील नागरिक यांना शहरात बँकिंगची सोय उपलब्ध व्हावी यासाठी साहेबांच्या प्रयत्नातून बँकेची स्थापना झाली. त्याकाळी पतपुरवठा करण्यासाठी कोणत्याही बँका पुढाकार घेत नव्हत्या. ज्या पतपेढ्या होत्या त्या अपुरा कर्जपुरवठा करीत असत. त्यामुळे शहरातील बहुतांश लोक सावकार, व्यापारी, नातेवाईक यांच्याकडून कर्ज घेत. सावकार मोठ्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात लोकांची पिळवणूक करीत असत, त्यामुळे शहरातील नागरिक, व्यापारी यांना कर्ज व्यवहार आपली बचत एकत्रित करण्यासाठी मोठ्या प्रमाणात दि विटा अर्बन बँकेने लोकांना सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. विटा शहरातील सहकारी तत्त्वावरील अर्बन बँक म्हणून 'दि विटा अर्बन को-ऑप. बँकेचे नाव प्रसिद्ध असलेले दिसून येते.

## 'दि विटा अर्बन को-ऑप. बँक लि., विटा'चा स्थापनेमागील उद्देश :

१. सभासदांमध्ये काटकसर, स्वावलंबन व सहकार्याची भावना वृद्धिंगत करणे.

२. जनतेकडून ठेवी स्वीकारून व त्याचा विनियोग कर्ज देण्यास किंवा



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

गुंतवणूक करण्यास करणे तसेच स्वीकारलेल्या ठेवी मागणी करताच अगर मुदतीने परत करणे.

३. कर्ज किंवा पैसा उभा करणे.

४. सभासदांना तारणावर किंवा विनातारणावर कर्ज देणे.

५. सर्व प्रकारच्या गुंतवणूक, स्टॉक्स, शेअर्स, कर्जरोखे, वचनचिठ्ठ्या, करारनामे, सिक्युरिटीज स्वीकारणे व त्यासंबंधीचे कमिशन अंडर रायटिंग व्यवहार करणे.

६. ग्राहकांतर्फे बॉंडस्, कर्जरोखे, वचनचिठ्ठ्या, इतर प्रकारचे दस्तऐवज विकत घेणे आणि विकणे.

७. सभासदांना लॉकर्सची सुविधा उपलब्ध करून देऊन त्यांच्या मौल्यवान दस्तऐवज, वस्तू स्वीकारणे.

८. ग्राहकांतर्फे हमीपत्र, वॉरंटी, नुकसानभरपाई व्यवहार करणे.

९. राज्य सरकार, नगरपालिका, सहकारी व इतर संस्था, संघटना, त्याचे कर्जरोखे, शेअर्स, विमाहमी, व्यवस्थापन इत्यादी सहभागी व्यवहार करणे.

१०. बँकेच्या पूर्ण अथवा अंशतः देण्यापोटी ताब्यात आलेल्या मालमत्तेची व्यवस्था करणे. विकणे अथवा तिची अन्यरितीने विल्हेवाट लावणे.

११. लघु व कुटीर उद्योगांना अर्थपुरवठा व तंत्रज्ञान उपलब्ध करणे व स्वयंरोजगारासाठी उद्योजकास स्वतःचा उद्योगधंदा उभारण्यास मदत करणे.

१२. बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट (सहकारी बँकेस लागू असलेले) १९४९ चे कलम नं. ६ (१) अन्वये इतर व्यवहार करणे.

१३. बँकेच्या उद्देशास अनुसरून व तिच्या वाढीस उत्तेजक जो धंदा करणे आवश्यक आहे तो करणे.

तालुक्यात वारंवार पडणारे दुष्काळ यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक अस्थैर्य निर्माण होत असताना बँकेच्या ग्राहकाने बँकेवर विश्वास दाखवून बँकेच्या प्रगती करण्यास मोठ्या प्रमाणात हातभार लावलेला आहे. नागरी भागातील सर्वसामान्य लोकांना कर्जपुरवठा उपलब्ध करून देणे हा बँकेचा प्रमुख

उद्देश असलेला दिसून येतो. त्याचबरोबर स्वयंरोजगार वाढण्यास मदत करणे, त्याचबरोबर त्यांचा विकास करणे हे बँकेचे महत्त्वाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याकडे बँकेचे लक्ष असलेले दिसून येते.

## ३.५ सारांश :

दि विटा अर्बन को-ऑप. बँकेचा अभ्यास करीत असताना या प्रकरणात नागरी सहकारी बँकांच्या सद्यःपरिस्थितीचा आढावा घेऊन भारतामध्ये असणाऱ्या नागरी सहकारी बँकांचा प्रादेशिक विषमतोलाचा अभ्यास केलेला आहे. प्रादेशिक विषमतोल पाहत असताना त्यांची राज्यवार स्थिती काय आहे? याचा विचार केलेला आहे. त्याचबेरोबर महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांची वाटचाल पाहात असताना १९९१ ते २००४ पर्यंत नागरी बँकांच्या संस्थांचा अभ्यास केलेला आहे. त्याचबरोबर सांगली जिल्ह्यील नागरी सहकारी बँकेच्या संख्येचा विचार या ठिकाणी करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर विटा अर्बन बँकेची स्थापना व तिचा उद्देश या प्रकरणात स्पष्ट करण्यात आलेला आहे.